(१)

क्रमांक जमीन २६९४/१३८४/प्र.क्र. ५६२९/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २० जानेवारी २००३.

विषय : जमीन मुंबई उपनगर जिल्हा
सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणा-या संस्थांना जमीन वितरीत करताना शासन निर्णय दिनांक ३०.६.१९९२ च्या धोरणाऐवजी शासन निर्णय दि.८.२.१९८३ व ११.५.१९८४ च्या धोरणाप्रमाणे किंमत आकारणेबाबत

ज्ञापन :-

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्याचे मला शासनाचे निर्देश आहेत. शासकीय जमिनी देण्याबाबतच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन दिनांक ८.२.१९८३ च्या निर्णयाअन्वये सर्व समावेश धोरण निश्चित करण्यात आले. तद्नंतर दिनांक ११.५.१९८४ च्या शासन निर्णयानुसार सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक कार्य करणा-या संस्थांना जमीन वितरीत करताना जमिनीची किंमत १.२.१९७६ च्या बाजार भावावर आधारित धरण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. कालांतराने शासनाने शासकीय जमिनी महाविद्यालयासाठी देताना सदर जमिनीचे मुल्य लगतपूर्व ५ वर्षे आधीच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असेलेल्या बाजारमुल्यांच्या 50 टक्के घेऊन कब्जेहक्काने अथवा या रक्कमेवर विहीत दराने भाडेपट्टा आकारुन भाडेपट्टयाने देण्याचे धोरण दिनांक ३०.६.१९९२ च्या निर्णयान्वये निश्चित केले. उक्त दिनांक ३०.६.१९९२ च्या निर्णयानुसार किंमत आकारुन खाली नमूद करण्यात आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक संस्थांना जमीन मंजूर करण्यात आली आहे अथवा हेतूपत्र देण्यात आले आहे.

१. **नाटयविहार कला केंद्र** - १८.१२.१९९६ रोजी मौजे वर्सोवा येथील सर्व नं. १६१ मधील भूखंड क्रमांक ७ मधील जमिनीसाठी हेतूपत्र दिले आहे. प्रश्नाधीन जमीन सी.आर.झेड मध्ये असल्याने अंतिम आदेश काढण्यात आलले नाहीत.

२. **सचिन शंकर बॅले युनिट** – दिनांक १८.१२.१९९६ रोजी मौजे वर्सोवा येथील स.नं. १६१ मधील भूखंड क्रमांक ५ मधील जमिनीसाठी हेतूपत्र दिले आहे. प्रश्नाधीन जमीन सी.आर.झेड मध्ये असल्याने अंतिम आदेश काढण्यात आलले नाहीत.

३. **सिने आर्टीस्ट वेल्फर ट्रस्ट** – प्रस्तुत संस्थेस वर्सोवा येथील स.नं. १६१ मधील भूखंड क्रमांक ८ मधील जमिनीसाठी दिनांक १८.६.१९९८ रोजी हेतूपत्र देण्यात आले व दिनांक ५.१.१९९९ रोजी जमीन मंजूर करण्यात आली. तथापि सदर जमिनी सी.आर.झेड मध्ये येत असल्याने संस्थेस सदर जमिनीऐवजी मौजे आंबिवली, स.क्र. १४१ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्रमांक ३-अ दिनांक १४.८.२००२ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला आहे.

४. **नौशाद अॅकडमी** – प्रस्तुत संस्थेस मौजे आंबिवली स.नं. १४१ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यातील भूखंड क्र.३ ड शासन आदेश दिनांक १४.८.२००२ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

५. **आचार्य जियालाल वसंत संगित विद्यालय** – प्रस्तुत संस्थेस मौजे विलेपार्ले येथील भूखंड क्र.४ शासन ज्ञापन दिनांक ७.४.१९९८ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

उपरोक्त ५ संस्थांचे कार्य हे सांस्कृतिक, सामाजिक स्वरुपाचे असल्याने उक्त संस्थांनी त्यांना जमीन मंजूर करताना अथवा हेतूपत्र देताना शासन निर्णय